11 DEC 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकस्मृती वसतिगृहास ठाकूर यांच्याकडून २५ लाख

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रामशेठ ठाकूर यांनी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांची देणगी दिली. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या 'महान शिवाजी' या महाग्रंथाची प्रत भेट देऊन ठाकूर यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.



कोल्हापूर : लोकस्मृती वसतिगृह योजनेसाठी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना माजी खा. रामशेठ ठाकूर.

शिवाजी विद्यापीठाच्या १९७२ च्या बॅचचे माजी विद्यार्थी असणाऱ्या रामशेठ ठाकूर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत 'कमवा आणि शिका' योजनेंतर्गत शिक्षण घेतले. ठाकूर यांनी १९६८ ते १९७२ या कालावधीत रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथून १९७२ मध्ये मराठी विषयातून शिवाजी विद्यापीठाची बी.ए. पदवी प्राप्त केली आहे. सध्या ते रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १९९८ ते २००४ या कालावधीत कुलाबा लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
तरुण भारत



कोल्हापूर : लोकस्मृती वसतीगृह योजनेसाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. सोबत व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख.

# रामशेठ ठाकूर यांची विद्यापीठ वसतिगृहास २५ लाखांची देणगी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, रायगडचे माजी खासदार व रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रामशेठ ठाकूर यांनी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतीगृह योजनेसाठी २५ लाख रूपयांची देणगी दिली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे त्यांनी २५ लाख रूपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या 'महान शिवाजी' या महाग्रंथाची प्रत माजी खासदार ठाकूर यांना भेट दिली.

शिवाजी विद्यापीठाने सर्वसामान्य विद्यार्थिनींसाठी लोकसहभागातून वसतीगृह उभारण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे ठाकूर यांनी सांगितले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, माजी खासदार रामशेठ ठाकूर हे शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी विनाविलंब २५ लाख रूपयांचा धनादेश सुपूर्द केला, लोकस्मृती योजना लवकरात लवकर साकार होईल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
सकाळ

# संत जगनाडे यांना अभिवादन

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठात संत संताजी जगनाडे यांची जयंती साजरी करण्यात आली. संत तुकाराम महाराज यांचे शिष्य असलेले आणि त्यांचे टाळकरी व लेखनिक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेल्या जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज भाषा उत्सव

कोल्हापूर : भारतीय भाषा दिवस आणि भारतीय भाषा उत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी आणि हिंदी अधिविभागाच्यावतीने आज, सोमवारी सकाळी ११.३० वाजता येथील वि. स. खांडेकर भवन येथे पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
लोकमत

# बाबासाहेबांमुळे सर्व समाज घटकांची उन्नती : महाजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानवी समाजाला दिशादर्शक आहे. ज्ञानाच्या आधारावर डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य संशोधनाच्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे. सर्वच समाजघटकांच्या उन्नतीसाठी बाबासाहेबांकडून झालेले कार्य नेत्रदीपक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात विधि अधिविभागातर्फे आयोजित डॉ. आंबेडकर व्याख्यानमालेमध्ये डॉ. महाजन प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. डॉ. मोरे म्हणाले, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक क्षेत्रातील योगदानामुळे डॉ. आंबेडकर पुढील हजारो वर्षे ज्ञानाच्या स्वरूपात अजरामर राहणार आहेत. डॉ. विवेक धुपदाळे यांनी परिचय करून दिला. राकेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. माजी प्राचार्य डॉ. आर. नारायणा यांनी आभार मानले. डॉ. शोभा शेट्टी, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. अरुण शिंदे, डॉ. बी. आर. इंगवले, डॉ. श्रीपाद गायकवाड, विधि शाखेचे विद्यार्थी, प्रशासकीय सेवक, शिक्षक यावेळी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2023
पुढारी

# 'दूरशिक्षण' केंद्रात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व नाईट कॉलेज ऑफ आर्टस् व कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य सैनिक श्रमनिया भारती यांच्या जयंतीनिमित्त ७५ व्या भारतीय भाषा उत्सवा निमित्त सोमवारी ऑनलाइन व्याख्यान होणार आहे. प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असणार आहेत.

Scanned with OKEN Scanner